**MHAH220009852026**

**फौजदारी किरकोळ अर्ज क्र.242/२०२६ मधील नि.क्र.१ खालील आदेश**

[ दिनांक १३.०८.२०२६]

श्री.मोहमंद गौस शेर मोहंमद कुरेशी

प्रस्तुतचा अर्ज अर्जदार याने भारतीय नागरीक सुरक्षा कायदा २०२३ चे कलम ५०३ अन्वये जप्त वाहनाचा अंतरिम ताबा मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. अर्जदाराचे थोडक्यात कथन असे की, महिंद्रा ॲण्ड महिंद्रा इंडिया लि., महिंद्रा बोलेरो च्मॅपर, या कंपनीचे चारचाकी वाहन अर्जदाराने खरेदी केलेले असून सदर वाहनाचा नोंदणी क्र. MH-08H-7335 चॅसीस नंबर MA1ZN2GGA71K49595, इंजिन नंबर GG71K57933 व रंग WHITE आहे. अर्जदाराचे मालकीचे सदर वाहन पोलीस स्टेशन, कर्जत येथे गु.र.नं.३४२/२०२६ नुसार महाराष्ट्र पशु संरक्षण १९७६ चे कलम ५(अ), ५(ब), ९,सह प्राण्याचा छळ प्रतिबंधक कायदा १९६० चे कलम ११,(३) प्रमाणे दाखल असलेल्या गुन्हयात कर्जत पोलीस यांनी जप्त केलेली आहे. भारतीय न्याय संहिता चे कलम ३१०(४) व ३१०(५) अन्वये गुन्हयाच्या कामी जप्त करण्यात आलेले आहे. सदरकामी कर्जत पोलिस स्टेशन येथे ठेवलेले आहे. सदर वाहन पो.ठाण्यात पडून राहिल्यास त्याचे पार्ट खराब होणार आहेत. सदर वाहन वापरात न राहिल्यास त्यामध्ये बिघाड होणार आहे. सदर वाहन हे दैनंदिन वापरासाठी गरजेचे असून न्यायालय सांगेल त्या अटी व शर्तीचे पालन करण्यास तो तयार आहे. सबब सदरील वाहनाचा अंतरिम ताबा मिळण्यासाठी त्याने प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

३. तपासी अधिकारी यांनी म्हणणे नि.क्र.६ लगत म्हणणे दाखल की, सदर

गुन्हयातील वाहन क्र. एम.एच.०८एच७३३५ कत्तल करण्यासाठी गुरे वाहतुक करण्याकरीता वापर केला आहे. सदर गुन्हयातील आरोपी हे आज रोजीपर्यंत पोलीस स्टेशनला हजर झालेले नाहीत. सदर वाहन हे अर्जदारास दिल्यास तो अशाच प्रकारचे गुन्हे करण्याची शक्यता नाकारता येत नाही. सदर वाहन अर्जदारास परत केल्यास त्यांना कायद्याची भिती राहणार नाही. सबब, सदर अर्ज नामंजुर करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

४. सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी नि.क्र.७ लगत म्हणणे दाखल केले व तपासी अधिकाऱ्यांच्या म्हणण्याप्रमाणे कथन करुन अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली.

५. अर्जदाराने त्याच्या कथनांच्या पृष्ठ्यर्थ पोलिस स्टेशन, कर्जत येथे दाखल गु.र.नं.३४२/२०२६ ची एफ.आय.आर. ची छायांकित प्रत (नि.क्र.३/१), सदर वाहनाची आर.सी.बुकची छायांकित प्रत (नि.क्र.३/२) व अर्जदाराचे स्वतःचे आधारकार्डची पडताळणी प्रत (नि.क्र.३/३) ही कागदपत्रे दाखल केली आहेत.

६. सदरील वाहन उपरोक्त गुन्ह्यात पोलीसांनी जप्त केलेले आहे, ही बाब विवादीत नाही. अर्जदाराच्या कथनानुसार तो जप्त वाहनाचा मालक आहे. सदर कथनाचे पुष्ठ्यर्थ त्याने सदर गुन्ह्यातील वाहनाचे आर.सी.बुकची प्रत दाखल केलेली आहे. त्यात नमूद वाहनाचे वर्णन अर्जदाराने अर्जात केलेल्या वर्णनाशी सुसंगत आहे. तसेच सदर वर्णनाचे वाहन पोलीसांनी गुन्ह्यात जप्त केलेले आहे, ही बाब विवादीत नाही.

७. पोलिसांचे असे कथन आहे की, गुन्हयात जप्त केलेली जनावरे यशोदानंद गोशाळा, राशीन, ता. कर्जत जि. अहिल्यानगर येथे संगोपनासाठी जमा करण्यात आलेली आहेत. पोलिसांचे पुढे असे कथन आहे की, जनावरांच्या वाहतुकीसाठी अर्जदाराने त्याचे वाहन वापरले म्हणून आरोपी आणि वाहन मालक हे वेगवेगळे किंवा संयुक्तपणे जनावरांच्या संगोपनाचा खर्च प्रति प्राणी २००/– रु प्रति दिन देणे आवश्यक आहे.

८. तपासी अधिकारी व सहा.सरकारी अभियोक्ता यांनी सदर वाहनाचा वापर तशाच प्रकारच्या गुन्ह्यात होण्याची शक्यता असल्याचे कथन केले आहे. सद्य स्थितीत तपासी अधिकारी यास तपासाकामी सदर वाहनाची आवश्यकता असल्याचे सकृतदर्शनी दिसत नाही. सदर वाहन जर अनिश्चित कालावधीसाठी पोलीस ठाणे येथे पडुन राहिले तर त्याचे नुकसान होण्याची शक्यता आहे. सकृतदर्शनी सदर वाहनाचे पोलिसांना तपासाकामी आवश्यकता असल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे मा. सर्वोच्च न्यायालयाच्या **सुंदरभाई अंबालाल देसाई वि. गुजरात राज्य** या न्याय निवाड्यातील निर्देशानुसार, तपासकामी सहकार्य करणे व वेळोवेळी सदरील वाहन पोलीसांच्या तपासात हजर करणे अशी अट घालून सदर वाहन परत करण्यास कोणतीही बाधा नाही असे दिसते. वरील विवेचनाआधारे अर्जदाराचा प्रस्तुत अर्ज योग्य त्या अटींवर मंजूर करणे न्यायोचित ठरेल. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे

## आदेश

१. अर्जदाराचा प्रस्तुत अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. अर्जदार मोहमंद गौस शेर मोहंमद कुरेशी यास पोलीस स्टेशन, कर्जत गु.र.नं. ३४२/२०२६ चे गुन्हयातील जप्त वाहन म्हणजे महिंद्रा बोलेरो च्मॅपर वाहनाचा नोंदणी क्र. MH-08H-7335 चॅसीस नंबर MA1ZN2GGA71K49595, इंजिन नंबर GG71K57933 व रंग WHITE या वाहनाचा अंतरीम ताबा पुढील अटींवर देण्यात येत आहे.

अ) अर्जदाराने रक्कम रू.१०,००,०००/- (अक्षरी रक्कम रुपये दहा लाख मात्र) चे वाहन निरक्षणग्राही बंधपत्र द्यावे.

ब) अर्जदाराने मुळ प्रकरणाचा निकाल लागेपर्यंत न्यायालयाच्या पूर्व परवानगीशिवाय सदर वाहनाच्या मुळ स्वरूप, रंग यात बदल करावयाचा नाही. तसेच सदर वाहन अन्य कोणासही हस्तांतरीत

अथवा तबदिल करावयाचे नाही.

क) अर्जदाराने सदर वाहनाचा वापर अर्जात नमूद प्रकारच्या गुन्हयांमध्ये करायचा नाही, तसेच न्यायालय अथवा तपासी अधिकारी निर्देश करतील त्याप्रमाणे हजर ठेवण्याचे आहे.

ड) अर्जदाराने प्रस्तुत गुन्ह्यातील जप्त पांढऱ्या रंगाचे गोवंश जातीचे ३ गावरान गाई व पांढऱ्या व काळया रंगाचे गोवंश जातीची एक जर्सी गाय अशा एकूण चार जर्सी गायींकरीता प्रती जनावरास प्रतिदिन र.रु.२००/–रुपये याप्रमाणे निगा व देखभालीचा खर्च म्हणून संबंधीत गोशाळेस सदर जप्त जनावरांचा ताबा दिल्याच्या तारखेपासून ते प्रस्तुत आदेशाचे दिनांकापर्यंत होणारी रक्कम द्यावी.

३. तपासी अधिकारी यांनी सदर वाहन अर्जदाराचे ताब्यात देतेवेळी सदर वाहनाचा नोंदणीकृत नंबर, चेसीस नंबर व इंजीन नंबरचा दर्शनी भाग दिसावा असे रंगीत फोटो काढून फोटोवर अर्जदाराची स्वाक्षरी घ्यावी व पंचनामा करावा. सदर पंचनामा व फोटो बंधपत्रासोबत तपासी अंमलदार यांनी न्यायालयात दाखल करावे.

४. अर्जदाराने बंधपत्र तपासी अधिकारी यांच्याकडे सुपुर्द करावे. अर्जदाराने तपासी अधिकारी यांना सहकार्य करावे.

RAMRAO BABURAO RAUT

Digitally signed by RAMRAO BABURAO RAUT
Date: 2026.08.14 11:20:26 +0530

कर्जत. (आर. बी. राऊत)

ता.१३.०८.२०२६ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी (कोर्ट क्र .२) कर्जत.

## प्रमाणपत्र

प्रमाणीत करण्यात येते की, या पी.डी.एफ. फाईलमधील प्रत्येक शब्द हा मुळ न्यायनिर्णयाच्या प्रतीप्रमाणे बरोबर आहे.

| | | |
|---|---|---|
| न्यायालयाचे नाव | : | **श्री. आर. बी. राऊत**<br>न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,<br>न्यायालय क्र.२, कर्जत, जि.अहमदनगर. |
| लघुलेखकाचे नाव | : | **भाग्यश्री बी. बांगर**<br>लघुलेखक (श्रेणी–३). |
| न्यायनिर्णय दिनांक | : | १३/०८/२०२६ |